**नियमित दिवाणी मुकदमा नं.९८/२०१८ मधील**

**निशाणी १ वरील आदेश**

(**CNR NO**.**MHSI**04-000563-2018)

**(मंगेश वाडयेकर वि. विद्याधर वाडयेकर व.७)**

प्रस्तुत दाव्यामध्ये दि.१७/०७/२०२६ रोजी न्यायनिर्णय पारीत झालेला आहे. सदर न्यायनिर्णयाच्या आदेश क्र.४ मध्ये "वादी यांचा गांव मौजे कवठी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील दावा मिळकत 'क' मिळकतीमध्ये सर्व्हे नं.२८, हिस्सा नं.१० व सर्व्हे नं.२८ हिस्सा नं.१३ मध्ये १/८ व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/८ व प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचा एकत्रात १/२ इतक्या क्षेत्राचा हिस्सा असल्याचे जाहीर करणेत येते." इतके क्षेत्र असल्याचे निष्कर्ष नोंदविला आहे. परंतु, अनावधानाने व टंकलेखनाच्या चुकीमुळे न्यायनिर्णयाच्या आदेश अनुक्रमांक ४ मध्ये "वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/४" एवढे क्षेत्र असल्याचे प्रस्तुत न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. तसेच आदेश क्र.४ मधील "प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचा एकत्रात १/२ हिस्सा" असल्याचे अनावधानाने नमुद झालेले आहे. सदर आदेश क्र.३ मध्ये प्रतिवादी क्र.४ ते ७ यांचा एकत्रात १/२ इतका हिस्सा असल्याचे नमुद करणे अनावधानाने राहून गेले आहे. सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असून, त्यामुळे न्यायनिर्णयामध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, न्यायनिर्णयाच्या आदेश अनुक्रमांक ३ व आदेश क्र.४ मध्ये दुरुस्ती करणेत यावी व दुरुस्तीनंतर प्रस्तुतचा न्यायनिर्णय सी.आय.एस. प्रणालीमध्ये अपलोड करणेत यावा.

सही/-

दिनांक -०६.०८.२०२६.

(न. अ. बकरे)

सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )

कुडाळ.